**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत राज्यातील ९२ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी केंद्र व राज्य शासनाच्या हिश्यातील निधीचा दुसरा हप्ता वितरीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: स्वमअ-२०१९/प्र.क्र.११२(६)/नवि-३४**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १८ सप्टेंबर, २०१९

वाचा:

१) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक: स्वभाअ-२०१५/प्र.क्र.२३/नवि-३४,दि. १५.०५.२०१५.
२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक: स्वमअ-२०१७/प्र.क्र.४३/नवि-३४,दि. ३१.०३.२०१७.
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/ अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९
४) केंद्र शासनाच्या गृह निर्माण व नगरीकार्य मंत्रालयाचे आदेश क्रमांक १/७/२०१५-SBM [Computer No. ३१०४७०६], दिनांक १३.०९.२०१९.

**शासन निर्णय:**

देशातील सर्व शहरे पूर्णपणे स्वच्छ, निरोगी आणि राहण्यायोग्य करणे आणि सर्व नागरिकांना स्वच्छ व चांगले आरोग्य आणि स्वच्छ पर्यावरण मिळावे तसेच देशातील सर्व सांविधानिक शहरांना स्वच्छतेची आणि या शहरामधील नागरीकांना घरगुती शौचालयांची सुविधा उपलब्ध करून देणे, या उद्देशाने केंद्र शासनाने “स्वच्छ भारत अभियान (नागरी)” ची अंमलबजावणी सुरु केली आहे. या अभियानाच्या धर्तीवर राज्यामध्ये संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविण्यात येत आहे.

२. स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी राज्य शासनामार्फत मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या मान्यतेने ९२ शहरांचे रुपये ३१८,०२,००,०००/- (तीनशे अठरा कोटी दोन लक्ष फक्त) इतक्या किंमतीचे प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आले होते. केंद्र शासनाने संदर्भीय क्र. ४ येथील दिनांक १३.०९.२०१९ रोजीच्या आदेशान्वये केंद्र शासनाचा अनुज्ञेय हिस्सा रुपये १०८,८०,००,०००/- (एकशे आठ कोटी ऐंशी लक्ष फक्त) पैकी दुसरा हप्ता म्हणून रुपये ५४,४२,००,०००/- (चोपन्न कोटी बेचाळीस लक्ष फक्त) एवढा निधी राज्यास वितरीत केला आहे.

३. स्वच्छ भारत अभियानांतर्गत केंद्र शासनाने राज्यातील ९२ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नागरी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांसाठी राज्यासाठी वितरीत केलेला दुसरा हप्त्याचा निधी रुपये ५४,४२,००,०००/- (रूपये चोपन्न कोटी बेचाळीस लक्ष फक्त) त्या प्रमाणात राज्य शासनाचा रूपये ३६,२८,१८,०००/- (रूपये छत्तीस कोटी अठ्ठाविस लक्ष आठरा हजार फक्त) असा केद्र व राज्य हिश्याचा मिळून एकूण रूपये ९०,७०,१८,०००/- (रूपये नव्वद कोटी सत्तर लक्ष आठरा हजार फक्त ) इतका निधी राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे. सदरचा खर्च पुढील तक्त्यात नमूद केल्यानुसार संबंधित लेखाशिर्षासमोर दर्शविल्याप्रमाणे संबंधित लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या तरतूदी मधून भागविण्यात यावा.

| अ.क्र | लेखाशिर्ष | अर्थसंकल्पीत करण्यात आलेली निधी रूपये |
|---|---|---|
| **अ)** | **महानगरपालिकांना** | |
| १ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९१, महानगरपालिकांना सहाय्य, (००) (७६) स्वच्छ भारत अभियानासाठी महानगरपालिकांना सहाय्य (केंद्र हिस्सा ७५%), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९७५२) योजनांतर्गत | ५,३८,००,०००/-<br>(रूपये पाच कोटी अडतीस लक्ष फक्त) |
| २ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९१, महानगरपालिकांना सहाय्य, (००) (७७) स्वच्छ भारत अभियानासाठी महानगरपालिकांना सहाय्य (राज्य हिस्सा), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९७६१) योजनांतर्गत | ३,५८,६८,०००/-<br>(रूपये तीन कोटी अठ्ठावन लक्ष अडुसष्ठ फक्त) |
| ब) | **नगरपरिषद** | |
| १ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९२, नगरपरिषदांना सहाय्य, (००) (७८) स्वच्छ भारत अभियानांतर्गत नगरपरिषदांना सहाय्य (केंद्र हिस्सा), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९७७९) योजनांतर्गत | ४८,७७,६९,०००/-<br>(रूपये अठ्ठेचाळीस कोटी सत्याहत्तर लक्ष एकोणसत्तर हजार फक्त) |
| २ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९२, नगरपरिषदांना सहाय्य, (००) (७९) स्वच्छ भारत अभियानासाठी नगरपरिषदांना सहाय्य (राज्य हिस्सा), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९७८८) योजनांतर्गत | ३२,५१,९५,०००/-<br>(रूपये बत्तीस कोटी एकावन्न लक्ष पंच्यान्नव हजार फक्त) |
| **क)** | **नगरपंचायतींना** | |
| १ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९३, नगरपंचायतींना सहाय्य, (००) (०३) स्वच्छ भारत अभियानांतर्गत नगरपंचायतींना सहाय्य (केंद्र हिस्सा), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९७९७) योजनांतर्गत | २६,३२,०००/-<br>(रूपये सव्वीस लक्ष बत्तीस हजार फक्त) |
| २ | मागणी क्रमांक-एफ-२, २२१७, नगरविकास, (८०) सर्वसाधारण, १९३, नगरपंचायतींना सहाय्य, (००) (०४) स्वच्छ भारत अभियानासाठी नगरपंचायतींना सहाय्य (राज्य हिस्सा), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ९८०३) योजनांतर्गत | १७,५५,०००/-<br>(रूपये सतरा लक्ष बत्तीस पंचावन्न हजार फक्त) |

४. सदर निधी आहरित करण्यासाठी राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी सदर रकमेचे देयक तयार करून ते अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांच्याकडे तात्काळ सादर करून सदर निधी आहरित करून धनादेश प्राप्त करून घेण्यात यावा. सदर निधीचे वाटप या शासन निर्णया सोबतच्या **विवरणपत्र-अ** मध्ये नमूद केल्यानुसार सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत करण्याबाबतची कार्यवाही राज्य अभियान संचालक यांनी करावी.

५. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/ अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/ अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९ अन्वये ३१, वेतनेत्तर सहाय्यक अनुदाने या बाबी खालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक ७ ते १८ पैकी ७ (१)आ, ७(३), ७(४) या प्रकरणी लागू नाही. सदर परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक ७(२) बाबत नमूद करण्यात येते की, केंद्र शासन पुरस्कृत योजनेसाठी केंद्र शासनाच्या हिश्श्याचा निधी वितरीत करावयाचा असल्याने त्यामधून स्थानिक स्वराज्य संस्थांकडून येणे असलेली रक्कम समायोजित करणे शक्य नाही. तसेच सदर परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक ७ (५,६,७,८,९) मध्ये नमूद अटींची पूर्तता करण्यात आली आहे.

७. शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/ अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९ च्या परिशिष्टातील अनुक्रमांक २, ३ या प्रकरणी लागू नाही. तसेच सदर परिशिष्टातील अनुक्रमांक ४ बाबत नमुद करण्यात येते कि, ही योजना केंद्र पुरस्कृत बाह्य सहाय्यित योजना नाही, तथापि केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्याची खात्री वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक: अनौ-३३२/अर्थोपाय, दिनांक १६/०९/२०१९ अन्वये करण्यात आली आहे.

८. शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/ अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९ रोजीच्या परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ३ च्या अनुषंगाने नमूद करण्यात येते कि, सदर योजनेच्या स्वरुपात अथवा व्याप्तीमध्ये कसलाही बदल करण्यात आलेला नाही. तसेच सदर दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजीच्या परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ संदर्भातील तपासणी सुचीमधील अनुक्रमांक १, २, ३,४ मध्ये नमुद करण्यात आलेल्या अटींची पुर्तता होत आहे. तसेच सदर अनुक्रमांक ८ संदर्भातील तपासणी सुचीमधील अनुक्रमांक ५ ते १० या प्रकरणी लागू नाही. तसेच शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/ अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९ मधील लागू असलेल्या उर्वरित सर्व अटींची पूर्तता होत आहे.

९. शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/ अर्थ-३, दिनांक १ एप्रिल, २०१९ मधील ७ (१) अ अन्वये ३१ वेतनेत्तर सहायक अनुदाने या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर शासन निर्णयान्वये एकूण रूपये ९०,७०,१८,०००/- (रूपये नव्वद कोटी सत्तर लक्ष आठरा हजार फक्त ) इतका निधी मंजूर करण्यात येत आहे.

१०. सदरचा शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक:अनौ-३३२/अर्थोपाय, दिनांक १६/९/२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१८१४२५४४०६२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ajit Sahebrao Palwe

Digitally signed by Ajit Sahebrao Palwe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bcc5dbdaa52955626b8257f1105a8a62ddbd1337948a428b4e4c992e5d3bf423, cn=Ajit Sahebrao Palwe
Date: 2019.09.19 15:36:03 +05'30'

**(अजित पालवे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा .मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा .राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, वित्त, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-२, नागपूर.
६. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
७. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद संचालनालय, मुंबई.
८. आयुक्त, महानगरपालिका, जळगांव
९. राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी), मुंबई.
१०. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
११. अधिदान व लेखाधिकारी, फोर्ट, मुंबई.
१२. अधिदान व लेखाधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे, मुंबई.
१३. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
१४. मुख्य लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१५. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
१६. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत
१७. निवडनस्ती, नवि-३४

शासन निर्णय क्रमांक: स्वमअ-२०१९/प्र.क्र.११६(६)/नवि-३४, दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ सोबतचे विवरणपत्र

विवरणपत्र-अ

**(रूपये कोटीत)**

| अनु.क्र. | शहराचे नाव | प्रकल्पाची मंजूर किंमत | केंद्राचा अनुज्ञेय हिस्सा | केंद्राने वितरीत दुसरा हफ्ता | राज्याचा अनुज्ञेय हिस्सा | राज्याचा वितरीत करण्यात येणारा दुसरा हफ्ता | एकूण वितरीत करण्याचा निधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **महानगर पालिका** | | | | | | |
| १ | जळगांव | ३०.७५१६ | १०.७६३१ | ५.३८०० | ७.१७५७ | ३.५८६८ | ८.९६६८ |
| | **नगरपरिषद** | | | | | | |
| १ | अहमदपूर | २.९१९२ | १.०२१७ | ०.५१०९ | ०.६८१२ | ०.३४०६ | ०.८५१४ |
| २ | अकोट | ५.१५८१ | १.८०५३ | ०.९०२७ | १.२०३६ | ०.६०१८ | १.५०४५ |
| ३ | आळंदी | ३.३७६१ | १.१८१६ | ०.५९०८ | ०.७८७८ | ०.३९३९ | ०.९८४७ |
| ४ | अलिबाग | १.२१७९ | ०.४२६३ | ०.२१३१ | ०.२८४२ | ०.१४२१ | ०.३५५२ |
| ५ | अमळनेर | ५.०५०२ | १.७६७६ | ०.८८३८ | १.१७८४ | ०.५८९२ | १.४७३० |
| ६ | अंबड | १.६८४८ | ०.५८९७ | ०.२९४८ | ०.३९३१ | ०.१९६६ | ०.४९१४ |
| ७ | अंबाजोगाई | ४.९८५५ | १.७४४९ | ०.८७२५ | १.१६३३ | ०.५८१७ | १.४५४१ |
| ८ | आर्वी | २.२८९२ | ०.८०१२ | ०.४००६ | ०.५३४२ | ०.२६७१ | ०.६६७७ |
| ९ | बदलापूर | १०.३८३८ | ३.६३४३ | १.८१७२ | २.४२३० | १.२११५ | ३.०२८७ |
| १० | भद्रावती | २.३८७१ | ०.८३५५ | ०.४१७७ | ०.५५७० | ०.२७८५ | ०.६९६२ |
| ११ | भगूर | १.०५१६ | ०.३६८० | ०.१८४० | ०.२४५४ | ०.१२२७ | ०.३०६७ |
| १२ | भोकरदान | १.६०३१ | ०.५६११ | ०.२८०५ | ०.३७४१ | ०.१८७० | ०.४६७६ |
| १३ | भोर | १.९९११ | ०.६९६९ | ०.३५०१ | ०.४६४६ | ०.२३३४ | ०.५८३४ |
| १४ | ब्रम्हपूरी | १.७६७३ | ०.६१८६ | ०.३०९३ | ०.४१२४ | ०.२०६२ | ०.५१५५ |
| १५ | बुलढाणा | ४.५३७२ | १.५८८० | ०.७९४० | १.०५८७ | ०.५२९४ | १.३२३४ |
| १६ | चौपडा | ३.६८७१ | १.२९०५ | ०.६४५२ | ०.८६०४ | ०.४३०२ | १.०७५४ |
| १७ | धामणगाव | १.३६२८ | ०.४७७० | ०.२३८५ | ०.३१८० | ०.१५९० | ०.३९७५ |
| १८ | देवळी | १.४६०१ | ०.५११० | ०.२५५५ | ०.३४०७ | ०.१७०४ | ०.४२५९ |
| १९ | देसाईगंज | १.३०३३ | ०.४५६१ | ०.२२८१ | ०.३०४१ | ०.१५२१ | ०.३८०१ |
| २० | देऊळगाव राजा | २.८८६९ | १.०१०४ | ०.५०६८ | ०.६७३६ | ०.३३७९ | ०.८४४७ |
| २१ | दिग्रज | २.८८२५ | १.००८९ | ०.५०४४ | ०.६७२६ | ०.३३६३ | ०.८४०८ |
| २२ | एरंडोल | २.६२७२ | ०.९१९५ | ०.४५९८ | ०.६१३० | ०.३०६५ | ०.७६६३ |
| २३ | गंगापूर | १.५०७९ | ०.५२७८ | ०.२६३९ | ०.३५१९ | ०.१७५९ | ०.४३९८ |
| २४ | गेवराई | ३.३६६३ | १.१७८२ | ०.५८९१ | ०.७८५५ | ०.३९२८ | ०.९८१९ |
| २५ | हिंगणघाट | ४.६३१८ | १.६२११ | ०.८१०६ | १.०८०८ | ०.५४०४ | १.३५१० |
| २६ | इंदापूर | २.०३५७ | ०.७१२५ | ०.३५६२ | ०.४७५० | ०.२३७५ | ०.५९३८ |

| अनु.क्र. | शहराचे नाव | प्रकल्पाची मंजूर किंमत | केंद्राचा अनुज्ञेय हिस्सा | केंद्राने वितरीत दुसरा हफ्ता | राज्याचा अनुज्ञेय हिस्सा | राज्याचा वितरीत करण्यात येणारा दुसरा हफ्ता | एकूण वितरीत करण्याचा निधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | जळगाव-जामोद | २.१४६९ | ०.७५१४ | ०.३७५७ | ०.५०१० | ०.२५०५ | ०.६२६२ |
| २८ | जामनेर | २.६७२८ | ०.९३५५ | ०.४६७७ | ०.६२३७ | ०.३११८ | ०.७७९६ |
| २९ | जिंतूर | ३.१७२९ | १.११०५ | ०.५५६९ | ०.७४०४ | ०.३७१३ | ०.९२८१ |
| ३० | जुन्नर | २.१५३६ | ०.७५३८ | ०.३७६९ | ०.५०२५ | ०.२५१३ | ०.६२८१ |
| ३१ | कागल | १.६४९२ | ०.५७७२ | ०.२८८६ | ०.३८४८ | ०.१९२४ | ०.४८१० |
| ३२ | कन्हान-पिंपरी | १.०६३४ | ०.३७२२ | ०.१८६१ | ०.२४८१ | ०.१२४१ | ०.३१०२ |
| ३३ | कन्नड | २.३८११ | ०.८३३४ | ०.४१६७ | ०.५५५६ | ०.२७७८ | ०.६९४५ |
| ३४ | कराड | ६.३१९७ | २.२११९ | १.१०५९ | १.४७४७ | ०.७३७३ | १.८४३३ |
| ३५ | कर्जत | १.२९०३ | ०.४५१६ | ०.२२५८ | ०.३०११ | ०.१५०५ | ०.३७६३ |
| ३६ | करमाळा | २.०३०१ | ०.७१०५ | ०.३५५३ | ०.४७३७ | ०.२३६९ | ०.५९२१ |
| ३७ | काटोल | १.७९७७ | ०.६२९२ | ०.३१४६ | ०.४१९५ | ०.२०९७ | ०.५२४३ |
| ३८ | खापा | १.१७२० | ०.४१०२ | ०.२०५१ | ०.२७३५ | ०.१३६७ | ०.३४१८ |
| ३९ | खोपोली | ३.२७९४ | १.१४७८ | ०.५७३९ | ०.७६५२ | ०.३८२६ | ०.९५६५ |
| ४० | खुलदाबाद | १.४४५८ | ०.५०६० | ०.२५४६ | ०.३३७४ | ०.१६९८ | ०.४२४४ |
| ४१ | कोपरगांव | ४.९११३ | १.७१९० | ०.८५९५ | १.१४६० | ०.५७३० | १.४३२५ |
| ४२ | कुंडलवाडी | १.३०२० | ०.४५५७ | ०.२२७९ | ०.३०३८ | ०.१५१९ | ०.३७९८ |
| ४३ | कुर्डूवाडी | २.२६९५ | ०.७९४३ | ०.३९७२ | ०.५२९६ | ०.२६४८ | ०.६६२० |
| ४४ | कुरुंदवाड | २.५३४२ | ०.८८६९ | ०.४४३५ | ०.५९१३ | ०.२९५६ | ०.७३९१ |
| ४५ | लोहा | १.९००० | ०.६६५० | ०.३३४१ | ०.४४३३ | ०.२२२७ | ०.५५६९ |
| ४६ | लोणावळा | १०.१९०० | १.३८४८ | ०.६९२४ | ०.९२३२ | ०.४६१६ | १.१५४० |
| ४७ | मैंदरगी | ०.९४९८ | ०.३३२४ | ०.१६६२ | ०.२२१६ | ०.११०८ | ०.२७७० |
| ४८ | मांजलगांव | ३.१८२३ | १.११३८ | ०.५५६९ | ०.७४२६ | ०.३७१३ | ०.९२८२ |
| ४९ | मलकापूर (बुलढाणा) | ४.०३७८ | १.४१३२ | ०.७०६६ | ०.९४२२ | ०.४७११ | १.१७७७ |
| ५० | मलकापूर(कोल्हापूर) | ०.६२३२ | ०.२१८१ | ०.१०९१ | ०.१४५४ | ०.०७२७ | ०.१८१८ |
| ५१ | मनवथ | २.७५८६ | ०.९६५५ | ०.४८२८ | ०.६४३७ | ०.३२१९ | ०.८०४६ |
| ५२ | मेहकर | ३.४१२९ | १.१९४५ | ०.५९७२ | ०.७९६४ | ०.३९८२ | ०.९९५४ |
| ५३ | मोवाड | ०.७२७९ | ०.२५४८ | ०.१२९० | ०.१६९९ | ०.०८६० | ०.२१५० |
| ५४ | मुदखेड | १.७००६ | ०.५९५२ | ०.२९९२ | ०.३९६८ | ०.१९९५ | ०.४९८७ |
| ५५ | मुरुड | १.२९९६ | ०.४५४९ | ०.२२७४ | ०.३०३३ | ०.१५१६ | ०.३७९१ |
| ५६ | नंदुरबार | ९.३७७१ | ३.२८२० | १.६४१० | २.१८८१ | १.०९४१ | २.७३५० |
| ५७ | नरखेड | १.५९८७ | ०.५५९५ | ०.२७९८ | ०.३७३० | ०.१८६५ | ०.४६६३ |
| ५८ | नेर | ३.०४१३ | १.०६४४ | ०.५३२२ | ०.७०९७ | ०.३५४८ | ०.८८७१ |

| अनु.क्र. | शहराचे नाव | प्रकल्पाची मंजूर किंमत | केंद्राचा अनुज्ञेय हिस्सा | केंद्राने वितरीत दुसरा हफ्ता | राज्याचा अनुज्ञेय हिस्सा | राज्याचा वितरीत करण्यात येणारा दुसरा हफ्ता | एकूण वितरीत करण्याचा निधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५९ | पैठण | २.१९४६ | ०.७६८१ | ०.३८४१ | ०.५१२१ | ०.२५६० | ०.६४०१ |
| ६० | पंढरपूर | ९.४२९३ | ३.३००३ | १.६५०१ | २.२००३ | १.१००१ | २.७५०३ |
| ६१ | पन्हाळा | ०.३२०० | ०.११२० | ०.०५६० | ०.०७४७ | ०.०३७३ | ०.०९३३ |
| ६२ | पारोळा | २.९७२० | १.०४०२ | ०.५२०१ | ०.६९३५ | ०.३४६८ | ०.८६६९ |
| ६३ | परतूर | १.५०२३ | ०.५२५८ | ०.२६२९ | ०.३५०६ | ०.१७५३ | ०.४३८२ |
| ६४ | पाथरी | २.३२३१ | ०.८१३१ | ०.४०६६ | ०.५४२१ | ०.२७१० | ०.६७७६ |
| ६५ | पेण | २.५३२३ | ०.८८६३ | ०.४४४८ | ०.५९०९ | ०.२९६५ | ०.७४१३ |
| ६६ | फलटण | ५.४०३० | १.८९१० | ०.९४७१ | १.२६०८ | ०.६३१५ | १.५७८६ |
| ६७ | पुलगांव | २.५०७९ | ०.८७७८ | ०.४३८९ | ०.५८५२ | ०.२९२६ | ०.७३१५ |
| ६८ | रहिमतपूर | १.२५२५ | ०.४३८४ | ०.२१९२ | ०.२९२३ | ०.१४६१ | ०.३६५३ |
| ६९ | रामटेक | १.६९३० | ०.५९२६ | ०.२९६३ | ०.३९५१ | ०.१९७५ | ०.४९३८ |
| ७० | रावेर | २.६५३५ | ०.९२८७ | ०.४६४४ | ०.६१९२ | ०.३०९६ | ०.७७३९ |
| ७१ | सांगोले | ३.१०१३ | १.०८५५ | ०.५४२७ | ०.७२३७ | ०.३६१८ | ०.९०४६ |
| ७२ | सासवड | ३.२३८७ | १.१३३५ | ०.५६६८ | ०.७५५७ | ०.३७७९ | ०.९४४६ |
| ७३ | सातारा | १५.३४८१ | ५.०४८२ | २.५२४१ | ३.३६५६ | १.६८२८ | ४.२०६९ |
| ७४ | शहादा | ५.३७९९ | १.८८३० | ०.९४१५ | १.२५५४ | ०.६२७७ | १.५६९२ |
| ७५ | शेगांव | ३.९९७२ | १.३९९० | ०.६९९५ | ०.९३२७ | ०.४६६४ | १.१६५९ |
| ७६ | सिल्लोड | २.७५४४ | ०.९६४१ | ०.४८२० | ०.६४२७ | ०.३२१४ | ०.८०३४ |
| ७७ | सिंदखेड राजा | १.४८८२ | ०.५२०९ | ०.२६२० | ०.३४७३ | ०.१७४७ | ०.४३६७ |
| ७८ | सोनपेठ | १.५८३४ | ०.५५४२ | ०.२७७१ | ०.३६९५ | ०.१८४७ | ०.४६१८ |
| ७९ | उमरखेड | ३.०६६४ | १.०७३२ | ०.५३६६ | ०.७१५५ | ०.३५७८ | ०.८९४४ |
| ८० | वडगांव कसबा | २.६९७० | ०.९४४० | ०.४७३६ | ०.६२९३ | ०.३१५७ | ०.७८९३ |
| ८१ | वैजापूर | २.२७८६ | ०.७९७५ | ०.३९८७ | ०.५३१७ | ०.२६५८ | ०.६६४६ |
| ८२ | वरणगांव | २.६६२१ | ०.९३१७ | ०.४६५९ | ०.६२१२ | ०.३१०६ | ०.७७६५ |
| ८३ | वाई | ३.१४९६ | १.१०२४ | ०.५५१२ | ०.७३४९ | ०.३६७५ | ०.९१८७ |
| ८४ | वानाडोंगरी | १.५१०५ | ०.५२८७ | ०.२६४३ | ०.३५२५ | ०.१७६२ | ०.४४०६ |
| ८५ | वर्धा | ४.४०८६ | १.५४३० | ०.७७१५ | १.०२८७ | ०.५१४४ | १.२८५९ |
| ८६ | वरोरा | ३.०२५४ | १.०५८९ | ०.५२९४ | ०.७०६० | ०.३५३० | ०.८८२४ |
| ८७ | वरुड | २.८२४५ | ०.९८८६ | ०.४९४३ | ०.६५९१ | ०.३२९५ | ०.८२३८ |
| ८८ | वाशिम | ५.१७२९ | १.८१०५ | ०.९०६९ | १.२०७१ | ०.६०४६ | १.५११५ |
| ८९ | यवतमाळ | १२.२७९३ | ४.२९७८ | २.१५०५ | २.८६५३ | १.४३३७ | ३.५८४२ |
| ९० | येवला | ४.४६९० | १.५६४२ | ०.७८२१ | १.०४२८ | ०.५२१४ | १.३०३५ |

| अनु.क्र. | शहराचे नाव | प्रकल्पाची मंजूर किंमत | केंद्राचा अनुज्ञेय हिस्सा | केंद्राने वितरीत दुसरा हफ्ता | राज्याचा अनुज्ञेय हिस्सा | राज्याचा वितरीत करण्यात येणारा दुसरा हफ्ता | एकूण वितरीत करण्याचा निधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **नगर पंचायत** | | | | | | |
| १ | महादुला | १.५०३८ | ०.५२६३ | ०.२६३२ | ०.३५०९ | ०.१७५५ | ०.४३८६ |
| | **एकूण** | **३१८.०१९४** | **१०८.८०१३** | **५४.४२००** | **७२.५३७८** | **३६.२८१८** | **९०.७०१८** |